# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:30.06.2024** **वार:रविवार**

---

1. भारत-चीन सीमेवर लडाखमध्ये युध्दअभ्यासादरम्यान 5 जवानांना वीरमरण
2. आकाशवाणीवरील मन की बातद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देशविदेशातील नागरिकांशी साधणार संवाद
3. तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या जागरुकतेसाठी आज मुंबईत परिषद.
4. अल्प कार्बन उर्जेच्या विकासासाठी जागतिक बँकेकडून दीडशे कोटी डॉलर्सच्या वित्तपुरवठ्याला मान्यता आणि
5. T-20 क्रिकेट स्पर्धेत 17 वर्षांनंतर विश्वचषकावर भारताची मोहोर तर महिलांच्या कसोटी क्रिकेटमध्ये 603 धावांचा विक्रम

**<u>वीरमरण</u>**

भारत-चीन सीमेवर लडाखमध्ये, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर सुरु असलेल्या T.72 रणगाडा युध्द अभ्यासादरम्यान झालेल्या अपघातातील बचावकार्य काल रात्री थांबवण्यात आलं आहे. पाच जवानांना या अपघातात वीरमरण आलं. या पाचही वीरांचे मृतदेह हाती लागले असल्याचं सैन्यदलाच्या प्रवक्त्यानं सांगितलं. दौलत बेग ओडे भागात रणगाडा युद्धाचा सराव सुरू असताना श्योक नदीला अचानक आलेल्या पुरामुळे ही दुर्घटना घडली अशी माहितीही प्रवक्त्यानं दिली.

**<u>मन की बात</u>**

आकाशवाणीवरील मन की बात या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या देशविदेशातील नागरिकांशी संवादाच्या मासिक कार्यक्रमाच्या 111 व्या भागाचे प्रसारण आज सकाळी 11 वाजता होणार आहे. आकाशवाणी आणि दुरदर्शनच्या सर्व वाहिन्या, पीएमओ आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाईल. त्यानंतर लगेच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित होणार आहे.

**<u>गोयल-निर्यात</u>**

चालू आर्थिक वर्षात भारत 800 अब्ज डॉलर्सची निर्यात करणं अपेक्षित असल्याचं केंद्रिय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी काल सांगितलं. काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सांताक्रूझ इथं इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवरील निर्यात प्रक्रिया क्षेत्र , तसंच निर्यातदार आणि बँकांना सहाय्य पुरवण्यासाठी असलेल्या एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि पेटंट्स, डिझाइन्स आणि ट्रेडमार्कचे नियंत्रक आदी संस्थांच्या कामाचा आढावा गोयल यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

**अधिवेशन**

महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानभवन परिसरात बातमीदारांशी बोलताना दिली. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्राला जाऊन देवदर्शन घेण्याची असते. मात्र आर्थिक अडचणीमुळे प्रत्येकाला ते शक्य होत नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी ही योजना सुरु करण्यात आली असल्याचं शिंदे यांनी म्हटलं आहे. तसेच, लाडकी बहिण या योजनेचा शासनादेश काढून विरोधी पक्षनेत्यांना दिला, असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. येत्या 1 जुलैपासून सर्व पात्र माता भगिनींना दरमहा पंधराशे रुपयांच्या रूपाने मिळणार आहेत. अडीच कोटींहून जास्त महिलांना त्याचा फायदा होणार असल्याचंही शिंदे यावेळी म्हणाले.

**मुंबई परिषद**

विधी आणि न्याय मंत्रालयाच्या विधी कार्य विभागातर्फे मुंबईत आज फौजदारी न्याय प्रणालीच्या प्रशासनात भारताचा प्रगतिशील मार्ग या विषयावरील परिषदेचं  आयोजन करण्यात आलं आहे. भारतीय न्याय संहिता 2023, भारतीय नागरी संरक्षण संहिता 2023, आणि भारतीय सक्षम अधिकारी, 2023 या तीन नवीन फौजदारी कायद्यांबाबत न्यायाधीश, वकील यांच्यासह सर्व संबंधितांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या परिषदेचा उद्देश आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, महाराष्ट्राचे विधी आणि न्यायव्यवस्था मंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई, गुजरात, पंजाब या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती, या तीन नवीन कायद्यांवर बोलणार आहेत. परिषदेत उद्घाटन सत्र आणि त्यानंतर प्रत्येक नवीन कायद्यावर तीन तांत्रिक सत्रं  होतील.

**जागतिक बँक**

जागतिक बँकेनं कमी-कार्बन उर्जेच्या विकासाला गती देण्यासाठी भारताला मदत म्हणून दुसऱ्या टप्प्यातल्या, दीडशे कोटी डॉलर्सच्या वित्तपुरवठ्याला मान्यता दिली आहे. हरित हायड्रोजन, इलेक्ट्रोलायझर्स आणि वाढीव नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी ही मदत केली जाते. यापूर्वी, जून 2023 मध्ये, जागतिक बँकेनं पहिल्या टप्प्यासाठी दीडशे कोटी डॉलर्स मंजूर केले होते.या नवीन निधीमुळे भारताला हरित हायड्रोजन उत्पादनाचा विस्तार करण्यासाठी  आणि कमी-कार्बन गुंतवणुकीसाठी निधी उभारण्याला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. राष्ट्रीय हरित हायड्रोजन योजना आणि ऊर्जा संक्रमण या उद्दिष्टांची प्राप्ती हे भारताचं ध्येय आहे. 2030 पर्यंत 500 गीगावॅट स्थापित अक्षय ऊर्जा क्षमता आणि 2070 पर्यंत निव्वळ शून्य गाठण्याचे केंद्र सरकारचं लक्ष्य आहे.

**डॉ एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर आजपासून दोन दिवसांच्या कतार दौऱ्यावर आहेत. यावेळी कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री शेख मोहम्मद बीन अब्दुल रेहमान बीन जस्सीम अल थानी यांची ते भेट घेणार आहेत. अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे. राजकीय, व्यापार, गुंतवणूक, उर्जा, संरक्षण, सांस्कृतिक तसंच दोनही देशातील विविध क्षत्रातील नागरिकांचं परस्पर सहकार्य अशा विविध मुद्यांवर चर्चा अपेक्षित आहे.

**<u>आयएनएस-रणवीर</u>**

भारतीय नौदलातील विनाशिका INS रणवीर बांग्लादेशातील चट्टग्राम बंदरावर सदिच्छाभेटीसाठी दाखल झाली आहे. नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या बांग्लादेश भेटीच्या पार्श्वभूमीवर INS रणवीर बांग्लादेशमध्ये दाखल झाली आहे. असं बांगलादेशातील भारतीय उच्चायुक्तांनी 'X' वर समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पुर्वेकडील समुद्रक्षेत्रात क्षेपणास्त्र विनाशिका आणि आघाडीच्या भागात युध्दजन्य मदत पुरवणं यासाठी ही विनाशिका तयार करण्यात आली आहे.

**<u>संग्रहालय</u>**

युग युगीन भारत संग्रहालय भारताचा प्रदीर्घ प्रवास दर्शवण्याचं काम करेल असा विश्वास केंद्रिय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी व्यक्त केला. नव्यानं उभारण्यात आलेल्या सेंट्रल विस्टा पुर्नविकास प्रकल्पाअंतर्गत रायसिना हिल्स परिसरांत राष्ट्रीय संग्रहालयाची उभारणी करण्यात येत आहे. 1 लाख 54 हजार चौरसमीटर क्षेत्रफळ क्षेत्रात फ्रांसच्या मदतीनं जगातील सर्वांत मोठ्या संग्रहालयाची निर्मिती करण्यात येत आहे. भारत आणि फ्रेंच प्रतिनिधींदरम्यान या संदर्भातल्या बैठकीची काल नवी दिल्ली इथं सांगता झाली.

**<u>अमरनाथ</u>**

जम्मू-काश्मीर मध्ये अमरनाथची वार्षिक यात्रा सुरळीतपणे सुरू असून यात्रेसाठी देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येनं यात्रेकरू दररोज मंदिरांचं शहर असलेल्या जम्मू मध्ये पोहोचत आहेत. यात्रेच्या पहिल्या दिवशी काल बारा हजार दोनशे एकवीस भाविकांनी शिवलिंगाचं दर्शन घेतल्याची माहिती आकाशवाणी श्रीनगरच्या प्रतिनिधीनं दिली.

**<u>पालखी</u>**

महाराष्ट्रात आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वार महाराज आणि संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आज पुणे शहरात प्रवेश करत आहे. दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. भवानी पेठेतील विठोबा मंदिरात संत ज्ञानेश्वकर महाराजांची पालखी मुक्कामासाठी येईल. तसेच नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरा संत तुकाराम महाराजांची पालखी मुक्कामी येईल.

**<u>सीबीआय पासपोर्ट प्रकरण</u>**

केंद्रीय अन्वेषण विभागांनं मुंबईतल्या, लोअर परळ आणि मालाड इथल्या पारपत्र सेवा केंद्रातले पारपत्र सहाय्यक आणि वरिष्ठ पारपत्र सहाय्यकांसह 14 अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे 12 गुन्हे नोंदवले आहेत. या व्यतिरिक्त सी बी आय नं 18 पारपत्र सुविधा देणारे खाजगी प्रतिनिधी आणि दलालांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपूर्ण माहिती असलेले अर्जदार किंवा ज्यांच्याकडे पूर्ण दस्तऐवज नाहीत, त्यांना पारपत्र जारी करण्यासाठी गैरप्रकार केल्याचे आरोप त्यांच्यावर आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसीच्या वीस षटकांच्या विश्वचषकावर भारतानं 17 वर्षांनंतर आपले नाव कोरले. 2007 नंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघानं अत्यंत उत्कंठावर्धक अंतिम समान्यात दक्षिण अफ्रिकेचा 7 धावांनी पराभव केला.

भारतानं प्रथम फलंदाजी करताना 176 धावा केल्या, विराट कोहलीनं स्पर्धेतला धावांचा दुष्काळ संपवत 76 धावा करत संघाला 3 बाद 34 धावांवरून संघाला मजबूत अवस्थेत आणले. अक्षर पटेलनं 47 तर शिवम दुबेनं 27 धावा केल्या. दक्षिण अफ्रिकेच्या, हेन्री क्लासेन, क्विंटन डीकॉक आणि डेव्हिड मिलर यांनी जिंकण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र भारतीय गोलंदाजांनी टिच्चून केलेल्या गोलंदाजीला सूर्यकुमार सारख्या क्षेत्ररक्षकांनी जबाबदार साथ देत विश्वचषक खेचून आणला. हार्दिक पांड्याने 3 तर जसप्रीत बुमराह आणि अर्शदीपसिंगने प्रत्येकी 2 बळी घेतले. विराट कोहलीला सामनावीर तर जसप्रीत बुमराहला मालिकावीर पुरस्कारानं गौरविण्यात आले. 1983, 2007, 2011 आणि 2024 असा एकंदर चारवेळा भारताने विश्वचषक उंचावला आहे.

तर महिलांच्या क्रिकेटमध्ये चेन्नई इथं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघाने 6 बाद 603 धावांचा डोंगर रचून नवा विक्रम प्रस्थापित करत डाव घोषित केला आहे. शफाली वर्माच्या 197 चेंडूतील वेगवान 205 धावा, स्मृती मनधनाच्या149 धावा तर जेमिमा रॉड्रीग्स,हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांच्या अर्धशतकांच्या जोरावर ही कामगिरी केली. तर दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावात 4 बाद 236 धावा झाल्या आहेत.

**<u>हवामान</u>**

नैऋत्य मोसमी पावसाची येत्या दोन तीन दिवसात देशभरात आगेकूच होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार येत्या बुधवारपर्यंत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा-चंडीगड, उत्तर प्रदेश, राजस्थान तसंच मध्य प्रदेश या ठिकाणी येत्या तीन चार दिवसांत अतिवृष्टी होण्याची शक्यता वर्तवली आहे. राजधानी दिल्लीत येत्या पाच ते सहा दिवस मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.